# मिरा भाईंदर महानगरपालिका

वाचा:- १) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्र.एमसीओ-२०२१/प्र.क्र.१०५(१)/नवि-१४ दि.१८/०६/२०२१.
२) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक मिभाम-१२२१/प्र.क्र.८५/नवि-२८, दि.०९/०८/२०२१.
३) जा.क्र.मनपा/आस्था/६८८/२०२१-२२ दि.२२/०६/२०२१ रोजीचा आदेश.

आस्थापना विभाग
जा.क्र.मनपा/आस्था/९७८/२०२१-२२
दि.१२/०८/२०२१

## - प्रत्यायोजन आदेश -

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागांच्या कामकाजाची व्यापती विचारात घेता कार्यालयीन कामकाजात सुसूत्रता येण्यासाठी व सर्व कामे विहित वेळेत होण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४९ अन्वये, खालील दर्शविलेल्या खात्यांचे व विभागांचे प्रशासन आणि, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या निरनिराळ्या प्रकरणात असलेल्या विविध तरतुदीखाली नमुद केलेले आयुक्तांचे अधिकार आणि कर्तव्ये, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त १ व अतिरिक्त आयुक्त २ यांचेकडे खालीलप्रमाणे सोपविण्यात येत आहे.

| अ.क्र. | अतिरिक्त आयुक्त (१) यांचेकडे सोपविण्यात आलेले विभाग<br>श्री. विजयकुमार म्हसाळ | अतिरिक्त आयुक्त (२) यांचेकडे सोपविण्यात आलेले विभाग<br>श्री. संभाजी पानपट्टे |
|---|---|---|
| १) | सार्वजनिक बांधकाम/विद्युत विभाग | पाणीपुरवठा विभाग व मलनिःस्सारण विभाग |
| २) | मालमत्ता कर विभाग | परिवहन विभाग |
| ३) | सामान्य प्रशासन व आस्थापना विभाग | शिक्षण व क्रिडा विभाग |
| ४) | अनधिकृत बांधकाम नियंत्रण/<br>फेरीवाला धोरण व प्रभाग समिती नियंत्रण | समाजविकास विभाग (एन.यु.एल.एम.)<br>उद्यान वृक्ष प्राधिकरण व पर्यावरण विभाग |
| ५) | स्थानिक संस्था कर विभाग | वैद्यकीय आरोग्य विभाग |
| ६) | वाहन विभाग | परवाना विभाग, जाहिरात विभाग |
| ७) | लेखा विभाग | लेखा परीक्षण विभाग |
| ८) | निविदा समिती अध्यक्ष | ई-टेंडरींग, सि.सि.टी.व्ही. यंत्रणा विभाग |
| ९) | निवडणूक विभाग | संगणक व नागरी सुविधा केंद्र |
| १०) | भांडार विभाग | बाजार लिलाव विभाग |
| ११) | जनगणना विभाग | माहिती व जनसंपर्क विभाग |
| १२) | अभिलेख विभाग | पे एन्ड पार्क, भुईभाडे विभाग |
| १३) | सुरक्षा विभाग | महिला व बालकल्याण विभाग |
| १४) | ग्रंथालय व अभ्यासिका विभाग | पशुसंवर्धन विभाग |
| १५) | | |

संबंधित अतिरिक्त आयुक्त यांनी वरील विभागांचे कामकाज, वेळोवेळी त्यांना प्रत्यायोजित केलेल्या आयुक्तांच्या वित्तीय व प्रशासकीय अधिकाराच्या मर्यादेत राहून पहावयाचे आहे. संबंधित उपायुक्त यांनी त्यांचे विभागातील प्रस्ताव त्यांच्या अतिरिक्त आयुक्त यांचेमार्फत पाठविण्याची दक्षता घ्यावी.

स्थायी समिती, महासभा अथवा केंद्र किंवा राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावयाचे सर्व प्रस्ताव आयुक्तांचे पुर्व मान्यतेने व मंजुरीनेच पाठवणे बंधनकारक राहील.



Scanned with CamScanner

रुपये १० लक्ष रकमेवरील ते रुपये २५ लक्ष रकमेपर्यंतचे ठेकेदार/ पुरवठादार यांच्या प्रदानासाठीची देयके मंजुर करण्याचे अधिकार त्या त्या विभागातील अतिरिक्त आयुक्त यांना असतील. मात्र धनादेशावर स्वाक्षरी करण्याचे अधिकार मुख्य लेखाधिकारी व संबंधित अतिरिक्त आयुक्त यांना राहतील.

तसेच रुपये २५ लक्ष रकमेवरील ठेकेदार/ पुरवठादार यांची प्रदानासाठीची देयके मंजुरीचे अधिकार आयुक्तांकडे अबाधीत राहतील. तथापि मंजुर केलेल्या धनादेशावर स्वाक्षरी करण्याचे अधिकार संबंधित अतिरिक्त आयुक्त यांना राहतील.

वरीलप्रमाणे संबंधित विभागांचे कामकाज पाहत असताना महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त, आपल्या पदावधीत व त्या पदाच्या आधारे पार पडलेल्या व केलेल्या सर्व कृती व गोष्टी, ह्या सर्व प्रयोजनासाठी आयुक्तांनी पार पाडल्या आहेत व केल्या आहेत, असे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४९ नुसार मानले जाईल.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :-
१) अतिरिक्त आयुक्त - १
२) अतिरिक्त आयुक्त - २
३) उपायुक्त (सर्व)
४) मुख्यलेखापरीक्षक
५) मुख्यलेखाधिकारी
६) खातेप्रमुख/ विभागप्रमुख (सर्व)

प्रत :- माहितीस्तव,
मा. महापौर ,मा. उप महापौर,मा. सभापती, स्थायी समिती,मा. सभागृह नेता,मा. विरोधी पक्ष नेता, मा.सभापती, परिवहन समिती.



Scanned with CamScanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

वाचा:- 1) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्र.एमसीओ 2021/प्र.क्र.105(1)/नवि-14, दि.18/06/2021.
2) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक मिभाम-1221/प्र.क्र.85/नवि-28, दि.09/08/2021.
3) जा.क्र.मनपा/आस्था/688/2021-22, दि.22/06/2021 रोजीचा आदेश.
4) जा.क्र.मनपा/आस्था/1104/2021-22, दि.12/08/2021 रोजीचा प्रत्यायोजन आदेश.

आस्थापना विभाग
जा.क्र.मनपा/आस्था/ १५८८ /2021-22
दि.२९/10/2021

## - सुधारित प्रत्यायोजन आदेश -

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागांच्या कामकाजाची व्याप्ती विचारात घेता कार्यालयीन कामकाजात सुसूत्रता येण्यासाठी व सर्व कामे विहित वेळेत होण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 39 (अ) अन्वये, खालील दर्शविलेल्या खात्यांचे व विभागांचे प्रशासन आणि, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या निरनिराळया प्रकरणात असलेल्या विविध तरतुदीखाली नमुद केलेले आयुक्तांचे अधिकार आणि कर्तव्ये, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त-1 व अतिरिक्त आयुक्त-2 यांचेकडे उक्त वाचा क्र.4 मधील आदेशान्वये सोपविण्यात आले आहेत. सदर आदेशामध्ये खालील प्रमाणे अंशत: बदल करण्यात येत आहे.

| श्री.विजयकुमार म्हसाळ - अतिरिक्त आयुक्त-1 | श्री.संभाजी पानपट्टे - अतिरिक्त आयुक्त-2 |
|---|---|
| परिवहन विभाग | सार्वजनिक आरोग्य (सफाई) विभाग |
| उद्यान व वृक्ष प्राधिकरण | - |

उर्वरित आदेश जसाच्या तसा लागू राहील.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
1) अतिरिक्त आयुक्त – 1
2) अतिरिक्त आयुक्त – 2
3) मुख्यलेखापरीक्षक
4) मुख्यलेखाधिकारी
5) खातेप्रमुख/ विभागप्रमुख (सर्व)

प्रत:- माहितीस्तव,
मा.महापौर, मा.उप-महापौर, मा.सभापती, स्थायी समिती, मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्ष नेता, मा.सभापती, परिवहन समिती.